महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

***<u>अतितात्काळ / कालमर्यादा</u>***

क्र.पोमसं/१६/८३००/कौ.ए.स./५७/२०१९-२०२२ मुंबई, दिनांक :- १५/११/२०२२

**विषय :- दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ ते २५ नोव्हेंबर, २०२२ हा सप्ताह " कौमी एकता सप्ताह " म्हणून साजरा करण्याबाबत व "कौमी एकता सप्ताहाच्या" कालावधीत दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ हा दिवस निधी संकलित करण्याकरिता "ध्वजदिन" म्हणून पाळण्याबाबत..**

*************

उपरोक्त विषयाबाबतचे शासन परिपत्रक, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र. कौएदि-२०२२/प्र.क्र.६४/का.८, दि. ०७ नोव्हेंबर, २०२२ च्या दोन परिपत्रकांन्वये (प्रत संलग्न) अनुक्रमे, दि. १९ नोव्हेंबर, २०२२ ते २५ नोव्हेंबर, २०२२ हा सप्ताह **" कौमी एकता सप्ताह "** म्हणून साजरा करण्याबाबत व **" कौमी एकता सप्ताहाच्या"** कालावधीत दि. २५ नोव्हेंबर, २०२२ हा दिवस निधी संकलित करण्याकरिता **"ध्वजदिन"** म्हणून पाळण्याबाबत खालील नमुद घटक कार्यालय प्रमुखांना विनंती आहे की, त्यांनी उपरोल्लिखीत दोन्ही शासन परिपत्रकांमध्ये नमुद करण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे, कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुढील आवश्यक ती कार्यवाही कृपया करावी.

**(एस. जयकुमार)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

**प्रति,**

*व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई. (सस्नेह)*
*महासंचालक, न्यायिक व तांत्रिक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).*
*महासमादेशक गृहरक्षक दल तथा महासंचालक, नागरी संरक्षण दल, म.रा मुंबई. (सस्नेह)*
*पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सस्नेह )*
*पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)*
*महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सस्नेह)*
*पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)*
*व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण व पोलीस कल्याण महामंडळ मर्यादित (सस्नेह)*
*अपर पोलीस महासंचालक, नियोजन व समन्वय / वाहतूक /नागरी हक्क संरक्षण , म.राज्य मुंबई.*
*अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे.*
*अपर पोलीस महासंचालक, आस्थापना, महाराष्ट्र राज्य, मुंबई.*

कृपया मागे पहावे...

सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण व पोलीस कल्याण महामंडळ मर्यादित.
अपर पोलीस महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, प्रशासन / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.राज्य,पुणे
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
उपमहासमादेशक, गृहरक्षक दल , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, का. व सु. / आस्थापना / प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / सायबर गुन्हे / सुधार सेवा / व्ही. आय. पी. सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सागरी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, रारापोबल, पुणे/नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली कॅम्प नागपूर.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.
प्राचार्य, अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.

*****

**दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ हा सप्ताह "कौमी एकता सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः कौएदि- २०२२/प्र.क्र. ६४ /का.८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ७ नोव्हेंबर, २०२२.

## शासन परिपत्रक

केंद्र शासनाने सन १९८६ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार **दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२** हा सप्ताह **"कौमी एकता सप्ताह"** म्हणून राज्यात साजरा करावयाचा असून त्यामध्ये आयोजित करावयाच्या पुढील कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार यावर्षी शनिवार **दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ ते शुक्रवार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२** हा कालावधी **"कौमी एकता सप्ताह"** म्हणून पाळण्यात यावा व त्यातील जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घेण्यात यावे. कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन, खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत:-

१) **शनिवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२** - राष्ट्रीय एकात्मता दिवस : धर्मनिरपेक्षता जातीयवादी विरोध व अहिंसा यांच्यावर भर देणारे सभा, चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित करावेत.

२) **रविवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२२** - अल्पसंख्याक कल्याण दिवस : अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी १५ कलमी कार्यक्रमावर भर देण्यात यावा, जातीय दंगली उदभवणाऱ्या शहरातून बंधुभाव निर्मितीसाठी खास मिरवणूका काढण्यात याव्यात.

३) **सोमवार दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२- भाषिक सुसंवाद दिवस :** भारताच्या अन्य भागातील लोकांच्या भाषेचा वारसाचा परिचय करुन देण्याच्या दृष्टीने विशेष वाङमयीन कार्यक्रम व कवी संमेलने आयोजित करण्यात यावीत.

४) **मंगळवार दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ - दुर्बल घटक दिवस :** २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत अनुसूचित जाती व जमाती मधील व्यक्ती व कमकुवत घटकातील व्यक्ती यांना मदत करण्यासाठी ठरवून दिलेले कार्यक्रम ठळकपणे निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने सभा व मेळावे भरविण्यात यावेत.

५) **बुधवार दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ - सांस्कृतिक एकता दिवस :** भारतीयांच्या विविधतेतील एकतेवर भर देणारे आणि सांस्कृतिक संरक्षण व एकात्मता संबंधाची भारतीय परंपरा सादर करणारे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

६) **गुरुवार दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ - महिला दिन :** भारतीय समाजातील महिलांचे महत्व व राष्ट्र उभारणीच्या विकासामधील त्यांची भूमिका यावर भर देण्यात यावा.

७) **शुक्रवार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ - जोपासना दिवस :** पर्यावरणाची जोपासना व त्याची जाणीव यासाठीच्या वाढत्या गरजेवर भर देणारे मेळावे व कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२. वरीलप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेखा लक्षात घेऊन माध्यमांचा उपयोग करावा.

१) ध्वजारोहण
२) मिरवणूका व सभा
३) राष्ट्रीय एकतेची शपथ
४) चर्चासंमेलने
५) चित्रपट दाखविणे व प्रदर्शने

तसेच भित्तीपत्रके, फलक यांच्यावर ठसठशीत असे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिकचिन्ह प्रदर्शित करावे.

३. शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत त्यांनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ दरम्यान एक सभा शक्यतो सकाळी प्रार्थनेच्या तासानंतर आयोजित करावी. सभेच्या अध्यक्षपदी संस्थेच्या सोयीप्रमाणे प्राचार्य किंवा विशेष निमंत्रित असावेत. त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता व ऐक्यभाव यासंबंधी विद्यार्थ्यांना समजेल अशा स्वरुपात विवेचने करावीत. कार्यक्रमाची सांगता समूह राष्ट्रगीताने करावी. शैक्षणिक संस्थांनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ या सप्ताहात राष्ट्रीय एकात्मतेची विविध पैलू ठळकपणे निदर्शनास आणण्यासाठी एखादा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे.

४. स्वयंसेवी संस्थांनी करावयाचे कार्यक्रम त्यांच्या सोयीने करण्याची त्यांना मोकळीक आहे. मात्र खालीलपैकी एक तरी कार्यक्रम त्यांनी राष्ट्रीय एकात्मता सप्ताहात ठेवावे -

१) राष्ट्रीय एकात्मतेवर प्रख्यात पुढाऱ्यांची भाषणे
२) राष्ट्रीय एकात्मतेची शपथ सामूहिकरित्या घेणे.
३) सांस्कृतिक कार्यक्रम करणे
४) राष्ट्रगीताचे सामूहिक गायन

५. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने निरनिराळ्या माध्यमाव्दारे या कार्यक्रमांस प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच राष्ट्रीय एकात्मतेचे संदेश देणारे चित्रपट दाखविले जातील असे पहावे.

६. महिला व बालविकास विभाग तसेच सांस्कृतिक कार्य विभाग यांनी विविध ठिकाणी उचित कार्यक्रम आयोजित करुन पार पाडावेत.

७. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात सर्व संबंधितांची मदत घेऊन हा कार्यक्रम वरीलप्रमाणे त्यांच्या विविध माध्यमातून आखला जाईल व यशस्वी केला जाईल असे पहावे. तसेच केलेल्या कार्यक्रमाचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२२११०७१६५०२१८९१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(वै.अ.काकडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
१०.पोलिस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य,
११.सर्व पोलिस आयुक्त,
१२.सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
१३.अध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
१४.अध्यक्ष/ कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई,
१५. मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक/प्रशासकीय अधिकारी,
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१७. कक्ष अधिकारी, सा.प्र.वि./२९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई (मंत्रालयात कार्यक्रम आयोजित करण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी)
१९. निवड नस्ती (का-८).

**कौमी एकता सप्ताहाच्या" कालावधीत दि.२५ नोव्हेंबर, २०२२ हा दिवस निधी संकलित करण्याकरिता "ध्वजदिन" म्हणून पाळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः कौएदि- २०२२/प्र.क्र. ६४ /का.८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ नोव्हेंबर, २०२२

# शासन परिपत्रक

केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने दि.१९ नोव्हेंबर, २०२२ ते दि. २५ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत पाळण्यात येणाऱ्या कौमी एकता सप्ताहामध्ये **"सांप्रदायिक सदभावना मोहिम (Campaign) निधी संकलन सप्ताह"** साजरा करण्यात येणार आहे. दि २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी **"ध्वजदिन साजरा"** करण्यात येणार आहे. ध्वजदिनाचा निधी संकलित करण्याकरिता व संकलित केलेला निधी राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्याकडे सूपुर्द करण्याकरिता अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत खालील सूचना देण्यात येत आहेत :-

१) दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ या दिवशी सर्व शासकीय कार्यालये, विद्यालये, महाविद्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे, सार्वजनिक संस्था आणि देणगीदार यांच्याकडून स्वेच्छेने निधी संकलित करण्यात यावा.

२) शासकीय कार्यालये, विद्यालये, महाविद्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून सदर निधी डब्यांतून संकलित करण्यात यावा. खाजगी संस्था वा देणगीदार अथवा करदाते यांना सदर निधीसाठी रक्कम दान म्हणून दयावयाची असेल तर त्यांच्याकडून अशी रक्कम धनादेशाव्दारे स्विकारण्यात यावी. धनादेशाव्दारे स्विकारलेल्या रकमेची पोच पावती त्यांना देण्यात यावी (पोच पावतीचा नमुना सोबत जोडला आहे).

३) खाजगी संस्था वा देणगीदार अथवा करदाते यांच्याकडून रक्कम धनादेशाव्दारे स्विकारताना धनादेश सचिव, राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठाण, नवी दिल्ली या नांवाने घेण्यात यावा.

४) निधी संकलित करण्यासाठी प्रत्येक जिल्हयातील जिल्हाधिकाऱ्यांनी व मंत्रालयीन विभागांनी माजी सैनिक कल्याण मंडळे, रेड क्रॉस सोसायटी अथवा तत्सम संघटना यांच्याकडून डबे उपलब्ध करुन घ्यावेत व निधी संकलित करण्याची कार्यवाही करावी.

५) निधी संकलित केलेले डबे सचिव, राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांचेकडे पाठविणे अडचणीचे, गैरसोयीचे व जोखमीचे असते. म्हणून डब्यात संकलित केलेला निधी हा कार्यालयातील जबाबदार अधिकाऱ्यासमोर मोजून त्याचा डिमांड ड्राफ्ट तयार करुन तो व इतर संस्था, देणगीदार यांच्याकडून आलेले धनादेश सचिव, राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठाण, सी विंग, ९ वा मजला, लोकनायक भवन, खान मार्केट, नवी दिल्ली - ११० ००३ यांच्याकडे नोदंणी टपालाव्दारे परस्पर पाठवावा किंवा संकलित केलेला निधी खालील बॅक खात्यावर परस्पर हस्तांतर करण्यात यावा व त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयात दि.१५ डिसेंबर, २०२२ पर्यत न चुकता पाठवावा.

| | |
|---|---|
| Name of Bank | Central Bank of India |
| Address of Bank | Khan Market, New Delhi- 110003 |
| Name of A/C holder | National Foundation for Communal Harmony |
| Account Number | 1065439058 |
| NEFT/IFSC/RTGS | CBIN 0280310 |

Or

| | |
|---|---|
| Name of Bank | State Bank of India |
| Address of Bank | Nirman Bhavan, Maulana Azad Road, New Delhi- 110011 |
| Name of A/C holder | National Foundation for Communal Harmony |
| Account Number | 10569548047 |
| NEFT/IFSC/RTGS | SBIN 0000583 |

Or

| | |
|---|---|
| Name of Bank | Bank of India |
| Address of Bank | Khan Market, New Delhi- 110003 |
| Name of A/C holder | National Foundation for Communal Harmony |
| Account Number | 600710110006040 |
| NEFT/IFSC/RTGS | BKID 0006007 |

२. राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्याकडून प्रसिध्दी साहित्य विभागास प्राप्त झालेले नाही त्यामुळे आपणांस सूचित करण्यात येते की आपण संबंधितांशी संपर्क साधून ते उपलब्ध करुन घ्यावे. राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने दि.२५ नोव्हेंबर, २०२२ रोजी संकलित करावयाच्या निधीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम ११ मधील तरतूद शिथिल करुन निधी संकलित करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांस मुभा देण्यात येत आहे.

३. सर्व जिल्हाधिकारी आणि सर्व मंत्रालयीन विभागांचे सचिव यांना उपरोक्त सूचनांप्रमाणे उचित कार्यवाही करुन जास्तीत जास्त निधी संकलित करण्याचा प्रयत्न करावा.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२२११०७१२५१४२७३१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(वै.अ.काकडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
१०.पोलिस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य,
११.सर्व पोलिस आयुक्त,
१२.सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
१३.अध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई

१४.अध्यक्ष/ कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई

१५.मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक/प्रशासकीय अधिकारी

१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)

१७.कक्ष अधिकारी, सा.प्र.वि./२९, सामान्य प्रशासन अधिकारी, मंत्रालय, मुंबई (मंत्रालयात कार्यक्रम आयोजित करण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी)

१९.निवड नस्ती (का-८).

## राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना प्रतिष्ठान, नवी दिल्ली

## दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ ध्वजदिन निधी

ठिकाण :- दिनांक :-

श्री/श्रीमती ______________________________________ यांचे कडून

रुपये __________________________

(अक्षरी) _______________________________________ ध्वजदिन निधीस मदत म्हणून मिळाले.

वसूल करणाऱ्याची सही व शिक्का

आयकर कायदा १९६१ मधील कलम ८० जी. अन्वये दिलेली रक्कम ही आयकरातून मुक्त करण्यात आली आहे.

**टिप :- सदर पोच पावतीवर रबरी शिक्का उमटविण्यात यावा.**